# मनोगत

मी अकरावी बारावीला असतांना केव्हातरी नेट सेट परीक्षेबद्दल वाचले होते. तेव्हापासूनच माझ्या मनाला नेट सेट परीक्षेबद्दल आपुलकी वाटत होती. पुढे बी. ए. ला असतांना ही आपुलकी अधिकच दृढ झाली आणि तिचे परिवर्तन संकल्पात झाले. या संकल्पाबरोबरच माझ्या नावापुढे 'डॉ.' ही पदवी लागावी आणि यासाठी मी पीएच. डी. व्हावं अशी एक सुप्त इच्छा माझ्या मनामध्ये घर करून होतीच. एम. ए. ला 'एच. पी. टी. आर्टस् अँड आर. वाय. के. सायन्स कॉलेज नाशिक' येथे असतांना हा संकल्प अधिक दृढ झाला. याची महत्त्वाची कारणे म्हणजे येथील सुसज्ज असलेले ग्रंथालय; ज्यामध्ये मी दिवसभर भूक तहान विसरून अभ्यासाला बसत होतो, परिसरातील अनेक डॉक्टर पदवी घेऊन वावरत असलेले प्राध्यापक; त्यातही तत्कालीन मराठी विभाग प्रमुख आणि संशोधन केंद्र प्रमुख डॉ. जयश्री पाटणकर आणि डॉ. वृंदा भार्गवे यांचा विशेष उल्लेख करावा लागेल, येथील मराठी विभाग आणि मराठी संशोधन केंद्र; ज्यामध्ये मला अनेक विषयावरील संशोधन प्रबंध पाहायला आणि वाचायला मिळाले. असे असले तरी यादरम्यान मी नेट किंवा सेट परीक्षा पास होऊ शकलो नाही. ही एक मोठी खंत घेऊन एम. ए. पहिल्या श्रेणीत पास होऊन बाहेर पडलो. आता पुढचे दरवाजे जवळजवळ बंद झालेले दिसत होते. माझ्या अनेक कॉलेज मित्रांनी पुढच्या शिक्षणाला रामराम ठोकला होता. अनेकांनी शेतीचा पारंपरिक व्यवसाय हाती घेतला होता. काहींनी लग्न करून संसार थाटला होता. माझीही तीच गत होऊ नये म्हणून मी एच. पी. टी. कॉलेजशी एकदमच नाते तोडले नाही. घरचे शेतीचे काम करता करता जेव्हा वेळ मिळेल तेव्हा कॉलेजला जाऊन ग्रंथपालाच्या अनुमतीने अनेक पुस्तकांचे वाचन केले. अनेक पुस्तकांच्या झेरॉक्स काढल्या. काही पुस्तके बाजारातून विकत घेतली. माझ्या या प्रयत्नाला एक वर्षानंतर फळ आले. मी जे. आर. एफ. सह नेट आणि सेट दोन्ही परीक्षा एकामागे एक पास झालो. आता सुप्तावस्थेत असलेली डॉक्टरेट पदवी एकदमच जागृत झाली. आणि मी त्या दृष्टीने अधिक विचार करू लागलो. या सर्व प्रक्रियेत एच. पी. टी. कॉलेज नाशिक, येथील मराठी विभाग व संशोधन केंद्र, प्राध्यापक वर्ग, ग्रंथालय व ग्रंथालयातील कर्मचारी, माझा मित्र परिवार या सर्वांचे महत्त्वाचे कार्य असून या सर्वांनी माझ्या पीएच. डी. पदवीसाठी वैचारिक पाया घातला. यास्तव या सर्वांचा मी ऋणी आहे.

नात्याने दूरचे परंतु आपुलकीने जवळचे असणारे, मित्राचा मुलगा जे. आर. एफ. सह नेट पास झाल्याबद्दल अतिउत्साहाने पेढे वाटणारे, मला माझ्या पीएच. डी. च्या मार्गदर्शकाशी प्रथम ओळख करून देणारे, पीएच. डी. प्रवेश प्रक्रियेच्या दरम्यान माझी राहण्या-खाण्याची सोय करणारे, त्यांची स्वतःची आणि इतरांची गुजराती पुस्तके मला उपलब्ध करून देणारे, सध्या महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटीच्या गुजराती विभागाचे प्रमुख असलेले माझे गुरुतुल्य मामा प्रा. डॉ. पुंडलिक पवार यांचे माझ्यावर अनंतोपकार आहेत. त्यांच्या उपकारांची परतफेड माझ्याने होणे शक्य नाही. यास्तव मी त्यांचे आभार व्यक्त करण्यापेक्षा त्यांच्या ऋणातच राहणे माझे कर्तव्य समजतो. तसेच मला समजून घेणारी माझी मामी सौ. मोहनाबेन पवार यांचेही मी ऋण व्यक्त करतो.

पीएच. डी. प्रवेश प्रक्रियेनंतर मी पहिल्यांदाच मराठी विभागात प्रवेश केला तो मुळात घाबरत घाबरतच. कारण माझं आतापर्यंतचं सगळं शिक्षण ग्रामीण भागातून झालेलं होतं. कोणत्याही विद्यापीठाचा विशेष परिचय नव्हता. शिवाय महाराजा सयाजीराव विद्यापीठाचं नाव गुजरातमध्ये विशेष नावाजलेलं आहे असं ऐकून होतो. त्यामुळे मनामध्ये थोडीशी आश्चर्यकारक भीती होती. परंतु माझे मार्गदर्शक व सध्याचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. संजयकुमार करंदीकर सर यांनी मला पहिल्याच दिवशी अभ्यासासाठी एक स्वतंत्र खोली दिली. त्यामध्ये कॉम्पुटर, प्रिंटर, इंटरनेट, टेबल, खुर्ची, कपाट आणि इतर साहित्य अशा सगळ्याच सोयी अभ्यासाच्या दृष्टीने उपलब्ध होत्या. हे सगळं पाहून माझ्या मनाला मोठा आधार मिळाला. आपलेपणाची जाणीव झाली. ही जाणीव आजही टिकून आहे. किंबहुना वृद्धींगत झाली आहे. गेली पाच वर्षे विभागात पूर्णवेळ संशोधनाचे काम करत असल्याने सरांचा जवळून परिचय झाला. यादृष्टीने त्यांच्या मार्गदर्शनाचा मला वेळोवेळी लाभ घेता आला. सरांशी वेळोवेळी चर्चा करता आली. त्यांच्याकडे ग्रंथसाठा खूप मोठा आहे. त्याचाही मला लाभ घेता आला. त्यांच्या मौलिक मार्गदर्शनामुळेच आज मी हा पीएच. डी. प्रबंध पूर्ण करू शकलो आहे. अशा अनमोल मार्गदर्शकाचे नुसते मार्गदर्शन घेऊन, त्यांचे आभार व्यक्त करून मोकळे होणे मला परवडणारे नाही. त्यांच्या मार्गदर्शनाची मला भविष्यातही गरज पडेल अशी मला खात्री आहे. ही मार्गदर्शनाची गरज भविष्यातही सरांकडून पूर्ण होईल अशी आशा व्यक्त करून सरांच्या सदैव ऋणात राहणे मी माझे आद्य कर्तव्य मानतो.

विद्यापीठाच्या मराठी विभागातील माजी विभाग प्रमुख व सध्या सेवानिवृत्त झालेल्या डॉ. मृणालिनी कामत मॅडम, सेवानिवृत्त डॉ. वनिता ठाकूर मॅडम, डॉ. वैभवी देहूकर मॅडम, सौ. भाग्यश्री वडवळे मॅडम आणि कु. दिपाली पंडित यांनीही मला संशोधन कार्यासाठी कळत नकळत साहाय्य केले. यास्तव त्यांचाही मी ऋणी आहे.

महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटीची 'हंसा मेहता लायब्ररी' खूप मोठी असून अनेक सोयी सुविधांनी सुसज्ज आहे. गुजरातमध्ये असूनही या लायब्ररीने मराठी ग्रंथांचा एक मोठा साठा आजपावेतो जपून ठेवलेला आहे व अजूनही या साठ्यात भर घालत आहे. या लायब्ररीचा मला माझ्या संशोधन कार्यात मोठा लाभ झाला आहे. यास्तव मी या लायब्ररीचा व लायब्ररीतील कर्मचारी वर्गाचा ऋणी आहे. तसेच पुण्याच्या 'बुक गंगा' या पुस्तक वितरण संस्थेनेही मला वेळोवेळी पुस्तकांची मागणी केल्याप्रमाणे पुस्तके उपलब्ध करून दिली. त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

कोणत्याही संशोधन कार्यासाठी आर्थिक सहाय्याची गरज असते. त्याशिवाय संशोधन कार्य पूर्ण करता येत नाही. माझी ही गरज यु. जी. सी. ने पूर्ण करून माझी आर्थिक टंचाई दूर केली. जे. आर. एफ. आणि एस. आर. एफ. अशा दोन्ही फेलोशिप मला यु. जी. सी. ने कुठलाही व्यत्यय न आणता सतत चालू ठेवल्या त्याबद्दल मी यु. जी. सी. चा खूप आभारी आहे.

युनिव्हर्सिटीच्या गुजराती आणि हिंदी विभागातील अनेक मित्रांनी मला वेळोवेळी सहाय्य केले आहे. त्यात प्रामुख्याने विनोदभाई गवळी, विजयभाई गवळी, राघवभाई, जिग्नेशभाई, कनुभाई, दिलीपभाई, राजेंद्रभाई या गुजराती विभागातील मित्रांबरोबरच हिंदी विभागातील दिलीपकुमार, मनीष पांडे, प्रमोद सिंह इत्यादी मित्रांचा मी आभारी आहे.

सुरुवातीच्या आठ-दहा महिने माझ्या जेवणा-खाण्याची सोय करणारी माझी मामाची मुलं तेजल, प्रदीप आणि जागृती यांचाही मी आभारी आहे.

लोकगीतकार या नात्याने लोकगीतांतील काही संकल्पना मला न समजल्यास माझी मदत करणारी माझी सासू सौ. यशोदा ठाकरे आणि सासरे श्री. सिताराम ठाकरे यांचाही मी ऋणी आहे.

लोकगीतकारांपर्यंत मला नेऊन पोहोचविणारे, काही रीतीरिवाजांची; सण-उत्सवांची मला सखोल माहिती पुरविणारे माझे मामा श्री. संतुभाई गावित आणि माझी मामी सौ. सोमीबेन गावित यांचाही मी ऋणी आहे.

ज्यांचा सतत माझ्या पाठीशी आशीर्वाद राहिला, ज्यांनी खऱ्या अर्थाने मला डांगच्या संस्कृतीची मूळातून ओळख करून दिली, ज्यांनी माझ्या जडणघडणीत अमौलिक असे संस्कार केले, ज्यांनी माझ्या जन्मापासून तर आतापर्यंतची सगळी जबाबदारी स्वीकारली, संशोधन म्हणजे नेमके काय? किंवा पीएच. डी. म्हणजे नेमके काय? हे नीटसे कळत नसतांनाही ज्यांनी माझ्या संशोधनाकडे आपुलकीने पाहिले ते माझे वडील श्री. यशवंत गायकवाड आणि आई सौ. सुमन गायकवाड यांचे आभार किंवा ऋण व्यक्त करून मी पापाचा भागीदार होणार नाही. त्यांचे शुभाशीर्वाद माझ्या पाठीशी सतत राहोत हीच इच्छा.

माझ्या संशोधनासाठी पोषक वातावरण निर्माण करून देणारी, लिखाणात मदत करणारी, लिहिलेले वाचून स्वतःचे मत व्यक्त करणारी, मुलगी चंचल हिला सांभाळत माझी काळजी घेणारी माझी पत्नी सौ. रचना गायकवाड हिचाही माझ्या संशोधन कार्यात महत्त्वाचा सहभाग असल्याने तिचेही आभार.

ज्यांनी माझ्या संशोधनाचा गाभा परिपक्व केला, ज्यांनी माझ्या संशोधनासाठी सामुग्रीचा पुरवठा केला, ज्यांच्याविना हे संशोधन कार्य पूर्ण होऊ शकले नसते ते लोककथाकार, लोकगीतकार, म्हणी-उखाण्यांचे संग्राहक, परंपरेने जीवन जगणारे डांगी आदिवासी जन. या सगळयांचा येथे नामनिर्देश करणे शक्य नसले तरी मी त्यांचा ऋणाईत आहे. तसेच माझ्या शोध प्रबंधासाठी अनेक लेखक-अभ्यासकांच्या ग्रंथांचा संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग झाला आहे. त्या सर्व लेखक-अभ्यासकांचा मी ऋणी आहे.

शेवटी लोकसाहित्य हे अनामिकाचे असते असे आपण म्हणतो. म्हणजेच लोकसाहित्याचा निर्माता अज्ञात असतो. अशाच अनेक अनामिक, अज्ञात लोकांचा माझ्या संशोधनासाठी उपयोग झाला असावा. परंतु त्यांचा काही कारणास्तव येथे नामनिर्देश झाला नसावा. अशा अनेक अनामिक, अज्ञात लोकांचा मी ऋणाईत आहे.

दिनांक: / /

गायकवाड गिरीश यशवंत